# रे.दि.मु.क.३८/२०१४ मधील नि.क्र.५ वरील आदेश

चंद्रराव पिसाळ वि।। विनायकराव पिसाळ

१) वादीनी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३९ रुल १क प्रमाणे दाखल केलेला आहे.

२) थोडक्यात अर्जातील कथने :– वादीने ते दावा मिळकतीचे मालक आहेत असे ठरवून मिळण्यासाठी व त्यांच्या कब्जे वहिवाटीस कोणीही हरकत अडथळा करु नये म्हणून दावा दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही ओझर्डे येथील गट नं. ११४० क्षेत्रफळ १ हे ४२ आर पो.ख ० हे ११ आर आहे. सन १९६७–६८ साली एकत्रीकरण योजनेच्या अंतर्गत जुना स.नं. २८० हिस्सा नं. १+२+३अ, क्षेत्र २ एकर १६ आर, पो. ख. ०८ आर व स.नं. २८० हिस्सा नं. ३ ब क्षेत्र १ एकर ०४ आर, पो. ख.०३ आर असा एकत्रित गट नं. ११४० झालेला होता व आहे. जुने स.नं. २८०/१,२८०/२ व २८०/३ हया मिळकती प्रतिवादीचे भाऊ नानासाो गणपतराव पिसाळ यांचे स्वकष्टार्जित होत्या. सदर मिळकती नानासाो पिसाळ यांनी महादेव गंगाधर कुलकर्णी यांचेकडून दिनांक ०१.०५.१९४४ रोजी खरेदी केलेल्या होत्या. दुरुस्ती गुणाकार बुकानुसार स.नं.२८०/१ याचा स.नं.२८० हिस्सा नं. १+२+३अ क्षेत्र २ एकर २४ गुंठे झाला. स.नं. २८० हिस्सा नं. २ याचा स.नं.२८० हिस्सा नं. ३ब क्षेत्र १ एकर ७ गुंठे झाला व स.नं.२८० हिस्सा नं. ३ याचा स.नं.२८० हिस्सा नं.३क क्षेत्र १ एकर ३५ गुंठे झाले. सन १९६१ सालात फेरफार नं.४९२८ ने प्रतिवादी विनायकराव पिसाळ यांचे भाऊ नानासाहेब यांनी वर्दी दिल्यावरुन स.नं.२८०/२ (म्हणजेच प्रत्यक्षात स.नं.२८० हिस्सा नं.३ब) व स.नं. २८०/३ (म्हणजेच प्रत्यक्षात स.नं.२८० हिस्सा नं.

३क) चे रेकॉर्ड सदरी पत्नी सौ. सुलोचना नानासाहेब पिसाळ यांचे नावे लागले. वादी यांनी सुलोचना पिसाळ यांचेकडून स.नं.२८०/३ व स.नं.२८०/२ अशा मिळकती दिनांक ०३.०७.१९६५ रोजी नोंदणीकृत खरेदीपत्राने खरेदी केल्या. परंतु त्यावेळी स.नं. २८०/३ मध्ये सुलोचनाबाई त्यांचे दिर म्हणजे प्रतिवादी यांची वहिवाट होती. स.नं. २८०/१ (म्हणजे स.नं.२८०/१+२+३अ) मध्ये प्रतिवादी यांचे कसलेही हक्क व संबंध नव्हते. स.नं. २८०/१ चे ७/१२ उताऱ्यास फेरफार नं. ४८७३ अन्वये प्रतिवादी यांच्या नावाची पोकळ नोंद होती. त्यामध्ये त्यांचा कब्जा व वहिवाट नव्हता. स.नं.२८० हिस्सा नं.१+२+३अ ही शेतजमीन चढ उताराची व तांबट व चुनखड स्वरुपाची व सुपीक नव्हती. त्या तुलनेत स.नं.२८०/३ (म्हणजे स.नं.२८० हिस्सा नं.३क) ही सुपीक होती. प्रतिवादी विनायकराव यांचे स.नं.२८०/१+२+३अ चे रेकॉर्डसदरी जरी नावाची नोंद असली तरी सुध्दा ती पोकळस्थ होती. स.नं.२८० हिस्सा नं.३क मध्ये त्यांची कायम वहिवाट होती व रेकॉर्ड प्रमाणे त्यांचे नावे असलेला स.नं.२८० हिस्सा १+२+३अ तसाच पडून होता.

३) वादीने दिनांक १३.०७.१९६५ रोजीचे खरेदीपत्र करुन घेतल्यावर खरेदी देणार सुलोचनाबाई व तिचे पती नानासाहेब यांच्या सांगण्यावरुन स.नं.२८०/३ च्या ऐवजी खरेदी देणार यांच्याच स्वकष्टार्जित मालकीची मिळकत स.नं. २८०/१(म्हणजे २८०/१+२+३ अ) वादीने मालकी हक्काने वहिवाटण्यास घेतली. त्यानुसार वादी हे सन १९६५ पासून सदर मिळकती वहिवाटत आहेत. गट योजनेनुसार स.नं.२८० हिस्सा नं. १+२+३अ व स.नं.२८० हिस्सा नं.३ब मधील प्रत्यक्ष वहिवाट लक्षात घेवून त्यांचे एकत्रीकरण होवून गट नं. ११४० करण्यात आला व त्याचा फेरफार नं.६०६७ असा होवून दिनांक १६.०८.१९७२ रोजी वादीस ट्रान्सफर सर्टिफिकेट देण्यात आले व त्यानुसार नकाशा तयार करण्यात आला. त्याबाबत नानासो पिसाळ व त्यांची पत्नी

सुलोचनाबाई यांनी कोणताही आक्षेप घेतलेला नव्हता. प्रतिवादी यांचा जुना स.नं. २८० मधील हिस्सा नं.३क मधील वहिवाट लक्षात घेवून व इतर चौकशी करुन त्याचा गट नं. ११४१ होवून तो प्रतिवादी यांच्या नावाने करण्यात आला. वादीने सदर शेत जमीनी वहिवाटण्यास आल्यानंतर त्याचे सपाटीकरण करुन सदर जमीन सुपीक केलेली आहे. सन १९६५ पासून ते सन १९९० पर्यत वादीने सदर जमीनीचे सपाटीकरण केलेले आहे व त्यास बराच खर्च केलेला आहे. जुना स.नं.२८० हिस्सा नं. १+२+३अ चे क्षेत्रात दक्षिण बाजूस पूर्वेकडे विहीर सन १९७२ मध्ये खणलेली असून तेथे वादीने विद्युत मोटार बसविलेली असून त्याचे बील वादी अदा करित आहे. वादी हे सदर जमीनीमधून बटाटे, उस, गहू अशी पिके घेत आहेत.

४) प्रतिवादी यांनी सन २००७ सालापर्यत वादीच्या संपूर्ण गटाबाबत कोणतीही हरकत नोंदविलेली नव्हती. परंतु सन २००७ सालापासून मुलकी कोर्टात फेरफार नं. ६०६७ बाबत रिव्हीजन, अर्ज व अपील दाखल केलेले आहे. तीन महिन्यापुर्वी उपसंचालयक भूमिअभिलेख, पुणे यांनी एकत्रित अपील नं.२३०१/२०१२ च्या कामी प्रतिवादीच्या बाजूने आदेश झाल्याचा गैरफायदा प्रतिवादी घेत असून वादीच्या मिळकतीस हरकत अडथळा करित आहेत. प्रतिवादीच्या बाजूने निकाल झाल्यानंतर प्रतिवादीनी गट नं.११४१ मध्ये विहीर काम सुरु केले व त्याकरिता पोकलेन आणून वाद मिळकतीच्या दक्षिण बाजूकडून ओढयातून वाद मिळकतीत शिरकाव करुन शेत जमीनीचे नुकसान केले व वाद मिळकतीचा ताबा जबरदस्तीने घेण्याचा प्रयत्न केला व प्रतिवादीने मुलकी अधिकारी यांचेपुढे गट नं. ११४० मधील जुना स.नं. २८० हिस्सा नं. १+२+३अ चा हिस्सा प्रतिवादीच्या कब्जात आहे असे भासविले. सबब प्रतिवादीने त्यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

५) प्रतिवादीनी नि.५१ वर म्हणणे दाखल केले आहे व अर्जातील कथने अमान्य करुन वादीचा गट नं. ११४० मधील स.नं.२८०/१+२+३अ मध्ये कधीही वहिवाट नव्हती. सदरची जमीन वादीने कधीही खरेदी केलेली नव्हती. वादीने स.न. २८०/३ क्षेत्र १ एकर ३५ गुंठे व स.नं.२८०/२ क्षेत्र १ एकर ७ गुंठे असे एकूण ३ एकर २ गुंठे क्षेत्र खरेदी केलेले होते. स.नं.२८०/३,२८०/२ या क्षेत्राशी गट नं. ११४० याचा जुना स.नं.२८०/१+२+३अ क्षेत्र २ एकर १६ गुंठे एकूण ८ गुंठे व स.नं. २८०/३ब क्षेत्र १ एकर ४३ गुंठे पो. ख. ३ गुंठे या क्षेत्राशी जुळत नाही. जुना स.नं. २८०/३ क्षेत्र १ एकर ३५ गुंठे व जुना स.नं.२८०/२ क्षेत्र १ एकर ७ गुंठे असे एकूण ३ एकर २ गुंठे क्षेत्र होते. परंतु जुना स.नं. २८०/१+२+३अ क्षेत्र २ एकर १६ गुंठे पो. ख. ८ गुंठे एकूण २ एकर २४ गुंठे व स नं.२८०/३ब क्षेत्र १ एकर ४ गुंठे पो.ख.३ गुंठे असे एकूण १ एकर ७ गुंठे या दोन्हीचे एकूण क्षेत्र ३ एकर ३१ गुंठे म्हणजे १ हे. ५१ आर होते. त्यामुळे दिनांक १३.०७.१९६५ चे खरेदीपत्राप्रमाणे ३ एकर २ गुंठे व गट नं. ११४०चे ३ एकर ३१ गुंठे असल्याने वादींनी स.नं.२८०/३ व २८०/२ या जमीनी खरेदी केलेली आहेत. जुना स नं. २८०/१,२८०/२, व २८०/३ हे मुळचे प्रतिवादीचे भाऊ नानासाहेब पिसाळ यांच्या मालकी हक्काचे होते. त्यांनी ते महादेव कुलकर्णी यांचेकडून खेरदी घेतल्या होत्या. गुणाकार बुकानुसार स.नं.२८०/१ याचा स. नं. २८०/१+२+३अ व स.नं.२८०/२ चा २८०/३ब व २८०/३चा २८०/३क झाल्याचे खोटे व चुकीचे आहे. सदर गुणाकार बुकात दुरुस्ती करताना मुळ मालकाची संमती घेणे व मुळ मालक हजर असणे बंधनकारक असताना मुळ मालक नानासाहेब त्यांच्या पत्नी सुलोचनाबाई अथवा प्रतिवादी विनायकराव पिसाळ हजर नसताना गुणाकार बुकातील नोंदी बेकायदेशीरपणाने करुन घेतलेल्या आहेत. परंतु त्यामुळे मुळ मालकांच्या वहिवाटीमध्ये कोणताही फरक पडत नाही. सुलोचनाबाई व त्यांचे पती नानासाहेब यांच्या सांगण्यावरुन वादीने स.नं.२८०/१+२+३अ ही वहिवाटण्यास घेतल्याचे खोटे व चुकीचे

आहे. वादीस त्यांच्या खरेदीपत्राप्रमाणे जुना स.नं.२८०/३ म्हणजे स.नं.२८०/३क याचे क्षेत्र १ एकर ३५ गुंठे व स नं.२८०/२ म्हणजे स.नं.२८०/३ ब याचे क्षेत्र १ एकर ७ गुंठे ऐवढेच वादीच्या कब्जात आहे. प्रतिवादीची स.नं.२८०/३ मध्ये प्रत्यक्ष वहिवाट होती व स.नं.२८०/१+२+३अ मध्ये कधीही वहिवाट नव्हती व ती मिळकत नानासाहेब यांची स्वकष्टार्जित खरेदी मिळकतीची होती हे चुकीचे आहे.

६) ओझर्डे ता.वाई येथील दळे आमराई याचा स.नं.२८० ही जमीन मुळची गणपतराव पिसाळ–देशमुख यांच्या मालकी हक्क वहिवाटीची होती त्याप्रमाणे रेकॉर्डला पुर्वी नोंदी होत्या. त्यानंतर पैशाच्या अडचणीपोटी गणपतराव देशमुख यांनी महादेव कुलकर्णी यांना स.नं.२८० पैकी काही क्षेत्र परत बोलीच्या व्यवहाराने दिले. काही क्षेत्र बापूसाहेब पिसाळ यांचे नावे देखील दिले होते ते क्षेत्र महादेव कुलकर्णी यांचेकडे बापूसाहेब पिसाळ यांनी दिल्याने ते सर्व क्षेत्र नानासाहेब पिसाळ हे प्रतिवादी विनाकराव व अन्य बंधू लालासाहेब यांचेमध्ये थोरले असल्याने महादेव कुलकर्णी यांचेकडून नानासाहेब पिसाळ यांचे नावे स.नं.२८० क्षेत्र खरेदी घेतले त्यामुळे जरी सन १९४४ साली नानासाहेब पिसाळ यांचे नावे स.नं.२८०/१, २८०/२, २८०/३ मधील जमीन खरेदी घेतली असली तरी सुध्दा ती मुळची गणपतराव देशमुख यांची वहिवाटीची होती. त्यामुळे ती प्रतिवादींची वडिलोपार्जित आहे व होती. सन १९६० रोजी स.नं. २८०/१ यास नानासाहेब पिसाळ यांनी अर्ज देवून फेरफार नं. ४८७३ ने प्रतिवादी विनायकराव यांच्या नावाची नोंद केली. स.नं.२८०/१ ही वडिलोपार्जित मालकी हक्काने प्रतिवादी यांचेकडे ठेवण्यात आली व स.नं.२८०/२, २८०/३ ,२८९/१ व २९५ पैकी क्षेत्र नानासाहेब पिसाळ यांचेकडे ठेवण्यात आले. स.नं.२८०/१ याचा नंतरचा स. नं.२८०/१+२+३अ ची मालकी व वहिवाट ही प्रतिवादींना वडिलोपार्जित मालकी हक्काने करित आहेत. सन १९६० मध्ये ते जमीनीमध्ये भुईमुग,ज्वारी, बाजरी,शाळू इ.

पिके घेत आहेत. नानासाहेब यांनी वादींना स.नं.२८०/३ च्या ऐवजी स.नं.२८०/१ म्हणजेच स.नं.२८०/१+२+३अ कधीही दिलेला नव्हता. प्रतिवादीने सदर दावा मिळकतीमध्ये पाईपलाईन करुन सर्व क्षेत्र बागायत केले आहे व तेथे प्रतिवादीची जमीन विहीर आहे. परंतु ती ढासळयाने काही अंतरावर नवीन विहीर काढून तेथून पाईपलाईन करुन पूर्ण जमीन बागायत केली आहे. बेकायदेशीर फेरफार व नोंदीने स.नं. २८०/१+२+३अ मधील मालकी हक्क वहिवाट संपुष्टात येवू शकत नाही. सबब वादीचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

७) वादीतर्फे विद्वान वकील श्री.एस.डी.खामकर व प्रतिवादी तर्फे विद्वान वकील श्री.डी.एस.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

८) दोन्ही बाजूंची परस्परविरोधी कथने लक्षात घेता खालील मुद्दे विचाराधीन आले आहे. त्यावरील निष्कर्षांची चर्चा कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे केली आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| .१. वादीना प्रथमदर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| .२ न्यायाचा तराजू त्यांचे बाजूने असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| .३. तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल काय ? | होकारार्थी. |
| .४. काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत** :–

मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने, घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व आदेशाची लांबी कमी करण्यासाठी त्यावरील निष्कर्षांची चर्चा मी एकत्रितपणे करीत आहे.

९) अर्ज व म्हणण्यातील कथनांचा विचार केला असता वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वाद हा स.नं.२८०/१+२+३अ बाबत आहे. वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत ही नानासाहेब पिसाळ यांची स्वकष्टार्जित होती. वादींनी नानासाहेब यांच्याकडून स.नं.२८०/२ व स.नं.२८०/३ ही मिळकत खरेदी केलेली होती. परंतु स. नं.२८०/३ ही प्रतिवादीच्या ताब्यात असल्याने नानासाहेब यांनी वादीना स.नं. २८०/३ ऐवजी स.नं.२८०/१ चा नवीन स.नं.२८०/१+२+३अ वहिवाटण्यास दिलेला होता. त्यानुसार प्रतिवादी यांचा स.नं.२८०/१+२+३अ यांच्याशी कोणताही संबंध नाही. यावर प्रतिवादीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकत २८०/१,२८०/२, व २८०/३ या जरी नानासाहेब यांच्या नावावर असल्या तरी सुध्दा त्यांनी त्या एकत्रित कुटुंबासाठी घेतल्याने त्या वडिलोपार्जित मिळकती आहेत.

१०) वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीचे रेकॉर्ड पाहिले असता वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये महसूली दरबारी तक्रारी झालेल्या आहेत. प्रतिवादीने जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख रत्नागिरी यांच्याकडे अपील एस.आर.नं.७५३/२०१० हा दाखल केलेला होता व गट नं. ११४७ व ११४१ यामध्ये गट बांधणी वेळीस झालेली चुक दुरुस्ती करण्याबाबत विनंती केलेली होती. त्यानुसार प्रतिवादीचे अपील मंजूर करण्यात आले. त्यावर नाराज होवून वादीने अपील एस.आर नं.२३०१/१२ दाखल

केलेला होता. सदर अपील उपसंचालक भूमी अभिलेख,पुणे यांनी फेटाळलेले आहे. त्याविरुध्द वादीने मा.सचिव तथा विशेष कार्यकारी अधिकारी महसूल विभाग यांचेकडे आर.टी.एस.नं.३२०४/१४ दाखल केलेले असून त्यामध्ये मा.सचिव व विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दावा मिळकतीमध्ये वादीचा कब्जा असल्याचे निष्कर्ष नोंदवून वादीचे अपील मंजूर केलेले आहे. त्याविरुध्द प्रतिवादींनी मा.उच्च न्यायालय यांचेकडे रिट दाखल केलेले आहे ते न्यायप्रविष्ठ आहे.

११) प्रतिवादींच्या वकिलांनी माझे लक्ष नि.५५/१,२,३ व ४ वर नानासाहेब पिसाळ आणि महादेव कुलकर्णी, लक्ष्मण राघु टपळे, बाबूसाहेब पिसाळ व गणेश बळवंत गोखले यांचेमध्ये दावा मिळकती संबंधीत झालेले खरेदीपत्रावर वेधले व असा युक्तिवाद केला की, सदर मिळकती हया वडिलोपार्जित आहेत. मुळत: सन १९३३ पासून वादातील मिळकतीवर नानासाहेब गणपतराव पिसाळ यांचे एकटयाचेच नाव असून त्यानंतर सुलोचनाबाई हिचे नाव लागल्याचे दिसते व तिने स.नं.२८०/२ व २८०/३ याचे खरेदीपत्र वादी यांच्या नावे करुन दिलेले आहे. वादी यांच्या कथनानुसार सुलोचनाबाई व गणपतराव यांनी स.नं.२८०/३ ही प्रतिवादीच्या ताब्यात असल्याने स. नं.२८०/१ चा नवीन स.नं. २८०/१+२+३अ वादींच्या ताब्यात दिली. सदर हस्तांतरानुसार वादी हे कायदेशीर मालक होतात किंवा नाही ही चौकशी व पुराव्या अंती ठरणार आहे. परंतु प्रस्तुत अर्ज निकाली करतेवेळेस दावा मिळकतीमध्ये कोणाचा कब्जा आहे हे पाहिले जाणार आहे.

१२) प्रतिवादीच्या वकिलांनी माझे लक्ष वादीने दाखल केलेले कागदपत्र नि. ४/१,२ वरील वादी व प्रतिवादीं यांच्या जमीनी एकत्रित केल्याबाबतचे परिपत्रक, नि.११ वर दावा मिळकतीबाबत हिस्सा फार्म नं.४ व नि.१८ नुसार दावा मिळकत स.न.

२८०/१+२+३अ वर प्रतिवादीचे नाव कमी करुन वादीचे नाव व नि.१९ वरील उताऱ्यानुसार स.नं.२८०/३क ला वादीचे नाव कमी करुन प्रतिवादीचे नाव जंगल वहिवाटीप्रमाणे लावलेले आहे यावर वेधले. नि.१९ वरील हक्काचे परिपत्रक गाव नमुना नं.६ चा नं. ६०६९ वर लक्ष वेधत असा युक्तिवाद केला की, महाराष्ट्र जमीन महसूल कायदानुसार जंगल वहिवाट असा कोणताही प्रकार नसताना गट योजनेनुसार स. नं.२८०/१+२+३ अ यास वादीचे नाव हे जंगल वहिवाटीनुसार लागलेले आहे. सदरच्या नोंदीबाबत नानासाहेब, त्यांच्या पत्नी अथवा प्रतिवादींना कोणतीही नोटीस नव्हती अशा परिस्थितीमध्ये तसे परस्पर बदल करणे हे बेकायदेशीर असून त्याची माहिती प्रतिवादीस असण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे केवळ रेकॉर्डवरुन प्रतिवादीचा दावा मिळकतीतील कब्जा जातो असे म्हणता येणार नाही. यावर प्रतिवादीच्या वकिलांनी खालील न्यायनिणयाचा आधार घेतला.

१. *सिता राम भाउ पाटील वि. रामचंद्र नागो पाटील, सुप्रिम कोर्ट, ए.आय.आर. १९७७ (एस.सी.)१७१२.*

२. *स्टेट ऑफ हिमाचलप्रदेश वि. केशव राम आणि इतर, ए.आय.आर. १९९७,सुप्रिम कोर्ट २१८१.*

३. *बालेश्वर तेवारी मयत तर्फे वारस आणि इतर वि. शेओ जतन तिवारी आणि इतर.ए.आय.आर,१९९७,सुप्रिम कोर्ट २०८९.*

४. *भागुबाई बयाजी पोकळे आणि इतर वि. कांतीलाल बबन गुंजवटे आणि इतर,ए.आय.आर,१९९८ बॉम्बे ११४.*

५. *मोहन बाळकू पाटील आणि इतर वि. कृष्णाजी भाउराव हुंद्रे मयत तर्फे वारस,ए. आय.आर.१९९९,सुप्रिम कोर्ट १११४.*

६. *मालाप्पा गुरुप्पा चायगुले वि. पदमण्णा ओरमण्णा सजणे, हायकोर्ट बॉम्बे, १९८० महाराष्ट्र लॉ.ज.३७७*

७. *हेमदास प्रेमदास रानबकुडा आणि इतर वि. श्रीमती. सुराजबाई धनसो सहू आणि इतर २००८ (३) ऑल.एम.आर.७६५*

८. *बलराम दयाराम मयत तर्फे वारस वि. भाउसिंग हरिसिंग मयत तर्फे वारस २००९ (६) ऑल. एम.आर.३५३*

९. *प्रकाश देवी आणि इतर वि.तरसेम लाल आणि इतर ए.आय.आर.२००३ पंजाब आणि हरीयाना २४५.*

वरील सर्व न्यायनिर्णयांचे अवलोकन केले. सदर सर्व न्यायनिर्णयानुसार केवळ महसूल दरबारी असणाऱ्या कागदपत्रावरुन त्या व्यक्तीस मालकी व कब्जा प्राप्त होत नाही असा निष्कर्ष उच्च व सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेला आहे. परंतु सर्व न्यायनिर्णयानुसार दाव्याच्या चौकशीअंती दावा मिळकत कोणाची मालकी आहे अथवा झालेल्या नोंदी हया कायदेशीर आहेत किंवा नाहीत हे ठरविता येणार आहे.

१३) वादींच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकती हया वडिलोपार्जित नव्हता व त्या नानासाहेब यांच्या स्वकष्टार्जित होत्या. याबाबत त्यांनी नि. १२ वरील नोंदीचा फेरफार नं.२६३४ वर लक्ष वेधले. सदर उताऱ्याचे अवलोकन केले असता सन १९४४ ला नानासाहेब पिसाळ यांनी महादेव गंगाधर कुलकर्णी यांचेकडून दावा मिळकतीसहीत इतर मिळकती खरेदी केल्याचे नमूद केले आहे. प्रतिवादीच्या वकिलांनी युक्तिवादादरम्यान अथवा म्हणण्यामध्ये सदर नोंद नाकारलेली नाही अथवा सदर मिळकती हया नानासाहेब यांनी एकत्र कुटुंबासाठी घेतलेल्या होत्या. परंतु त्याचे एकटयाचे नाव लागलेले आहे याबाबत त्यांनी योग्य ती कार्यवाही केलेली होती व त्यानंतर सर्व मिळकती सर्व वारसांच्या नावे लागलेल्या आहेत. त्याचप्रमाणे नि.१४ वर फेरफार नोंद क.४७९८ चे अवलोकन केले असता विनायकराव गणपतराव पिसाळ म्हणजेच प्रतिवादी यांनी अर्ज करुन स.नं. २८०/१ म्हणजेच वादातील मिळकत स. नं.

२८०/२ व स.नं.२८०/३ यावरील नानासाहेब यांचे नाव कमी करुन विनायकराव व लालासाहेब यांचे नाव लावण्यासाठी दिनांक १०.०४.१९५९ रोजी अर्ज केल्याचे नमूद नमूद आहे. परंतु त्यावर तपासणी अंमलदार यांनी तक्रार आहे व केवळ प्रतिवादीच्या एकटयाच्या अर्जावरुन नोंद कमी करता येत नाही व विनायकराव यांची दप्तरी अर्ज नाही म्हणून सदर अर्ज नामंजूर केलेला आहे. नि.१५ वर नोंद क्र.४८७३ चे अवलोकन केले असता त्यामध्ये नानासाहेब गणपतराव पिसाळ यांनी वर्दी दिल्यावरुन दावा मिळकतीस प्रतिवादीचे नाव दाखल केले. मुळत: दावा मिळकत हया स्थावर मिळकती असल्याने व प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत ही वडिलोपार्जित होती तर प्रतिवादी व नानासाहेब यांना अजून एक भाउ लालासाहेब हे असताना केवळ वर्दी वरुन नाव लागले हे संदिग्ध वाटत आहे. कारण वाटपाद्वारे मिळकती वेगवेगळया झाल्या होत्या असे कथन नाही व वाटपाद्वारे झाली असती तर एकाच्या वर्दीची आवश्यकता नव्हती तर आपआपसात झालेल्या वाटपानुसार नावे लावण्यात येत आहे अशी नोंद झाली असती.

१४) प्रतिवादीने नानासाहेब यांच्या पत्नी सुलोचना यांनी स. नं.२८०/२ व २८०/३ याचे खरेदीपत्र वादीच्या नावे करुन दिलेले होते याबाबत कोणतीही हरकत नोंदविलेली नाही. कारण प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार स.नं.२८०/२ व २८०/३ देखील वडिलोपार्जित आहेत. वादीने नि.४/६ वर वाद मिळकतीतील विहीरीवर विद्युत मोटार असल्याबाबत त्याचे विज बील दाखल केलेले आहे. त्यामध्ये विहीर कोणत्या गटात आहे हे दिसून येत नाही. नि.४/७ वर मुंबई जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबतचे प्रमाणपत्र १६.०८.१९७२ रोजी वादी यांना गट नं.११४० बाबत प्रदान केल्याचा उतारा दाखल केलेला आहे. नि. २९/१,२ दावा मिळकतीमधील उस हा किसनवीर साखर कारखाना यांना घालण्याबाबत

उस वजन चिठ्ठी दाखल केलेली आहे. त्याचप्रमाणे दावा मिळकतीचे फोटोग्राफ्स दाखल केलेले आहेत. परंतु फोटोवरुन ते दावा मिळकतीचे फोटो आहेत असे गृहीत धरता येणार नाही. परंतु गेल्या अनेक वर्षाच्या महसूल रेकॉर्डनुसार दावा मिळकतीत वादीचा कब्जा प्रथमदर्शनी दिसून येतो. अशा परिस्थितीत सदरची कागदपत्रे जरी वादीच्या नावे असले तरी सुध्दा प्रत्यक्षात प्रतिवादींचा स.नं.२८०/१+२+३ अ मध्ये कब्जा आहे हे दाखविण्यास प्रतिवादी हे लगत कब्जेदारांचे प्रमाणपत्र दाखल करु शकले असते अथवा सदर गटामध्ये ते पीक घेत असल्याबाबत पुरावा दाखल करणे त्यांना अशक्य नव्हते. त्याचप्रमाणे स.नं.२८०/१+२+३ अ व २८०/३ या एकमेकांपासून वेगवेगळया ठिकाणी असून त्यांचा एकत्रित गट होवू शकत नाही असा कोणता तरी पुरावा कागदोपत्री पुरावा खोडून काढण्यासाठी आवश्यक आहे. तसा कोणताही पुरावा पटलावर नाही. प्रतिवादीचे नाव असलेल्या उताऱ्या वरुन नि. १० नुसार त्यांनी कर्ज घेतल्याचे दिसते. म्हणजेच प्रतिवादींनी दावा मिळकतीबाबत कधीही महसूल रेकॉर्ड काढले नव्हते त्यामुळे त्यांना माहिती नाही असे म्हणता येणार नाही. कारण रेकॉर्ड हे नवीन नसून ते खूप जुने आहे.

१५) स.नं. २८०/१+२+३ अ मध्ये वादीची कायदेशीर मालकी आहे किंवा नाही अथवा वादी यांना जंगल वहिवाटीप्रमाणे कायदेशीर मालकी प्राप्त होत किंवा नाही हे मुददे चौकशीअंती ठरणार आहेत. परंतु आलेल्या पुराव्यावरुन दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जे वहिवाट असल्याचे दिसून येत आहे. वादी व प्रतिवादीमध्ये महसूल तक्रारी असून मनाई हुकूम दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी देवून मुद्दा क्र.४ साठी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजुर केला आहे.

२. प्रतिवादी यांनी स्वत: अगर इतरांमार्फत वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त ताकीद दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च अंतिम निकालाच्यावेळी विचाराधीन राहिल.

दिनांक : १८/०४/२०१५

(दि.तु.जाधव)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वाई.